ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-I ISSUE-VI Nov. 2014

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# शिक्षण प्रकियेत शिक्षक एक प्रेरणादायी व्यक्तीमत्व

डॉ. उज्ज्वला के.सदावर्ते
प्राचार्य
विवेक वर्धिनी अध्यापिका महाविद्यालय, नांदेड.
Email :- druksuks000@gmail.com

*शिक्षण प्रक्रियेत विद्यार्थी हा घटक केंद्र स्थानी आहे. विद्यार्थींना जाणून घेण्याची ओळखण्याची क्षमता ही शिक्षकाजवळ असणे जरूरीचे असते. विद्यार्थी कसा आहे त्याचे अनुभव विश्व कोणते आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या उत्सफुर्तपणाला सर्जनशिलता प्रयोग शिलतेला वाव देणे हे शिक्षकाचे महत्वाचे कार्य यासाठी प्रेरणादायी शिक्षण विद्यार्थ्यांना देणे, त्यांच्यात शिकण्याची प्रेरणा निर्माण करणे ज्ञान व अनुभव मिळविण्यासाठी प्रवृत करणे. '' घोडयाला पाण्यापर्यंत नेता येते पण पाणी पिण्याची सक्ती करता येत नाही'' या म्हणीचा अर्थ असा आहे की शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अध्ययन होण्याची प्रयत्नाची षर्थ केली पाहिजे. शिकण्याची उर्मी जागृत केली पाहिजे प्रेरणे मूळेच विद्यार्थी अध्ययन करण्यास उदयुक्त होतो. प्रयत्नशील राहतो व ध्येय गाठण्याचा प्रयत्न करतो.*

*It is your Unique*
*Guidance & Methods*
*That urges me to excel*
*In all that I do*
*Teacher you are really inspire me*

मानवी जीवनात प्रेरणेला महत्व आहे. शिक्षणात देखील प्रेरणा हा घटक महत्वाचा मानला जातो. विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी प्रेरीत करणे, त्यांना मानसिक दृष्टया प्रवृत करणे.षिक्षणात गोडी निर्माण करणे हे शिक्षकाचे आदय कर्तव्यच असते. त्यामुळे विद्यार्थी शारिरीक व मानसिक दृष्टया शिक्षण प्रक्रियेत सहभागी होईल व त्याचे अध्ययन होईल प्रेरणा म्हणजे चालना, स्फुर्ती देणे, मनात उर्मी जागृत करणे.

प्रेरणा ही व्यक्तीच्या वर्तनात चालणा देणारी शक्ती होय. प्रतिक्रिया मधील जोश किंवा आवेग वाढवणारी स्थिती म्हणजे प्रेरणा होय. प्रेरणेचे वर्गीकरण मुख्यत्व दोन प्रकारे केले जातो.

**01. अंतरीक प्रेरणा**

**02. बाहय प्रेरणा**

अंतरीक प्रेरणा ही स्वयं प्रेरीत असते व ती दीर्घकाल टिकाणारी असते. त्यात व्यक्ती आपली गरज निर्माण करते व स्वतः ध्येय ठरवते अंतरीक प्रेरणामुळे अभिरूची आपोआप निर्माण होते. बाहय प्रेरणा जेव्हा व्यक्ती स्वताःहून कार्य करत नाही तेव्हा बाहय गोष्टीचा प्रेरणेसाठी उपयोग करावा लागतो. बाहय प्रेरकांनी जागृत होणारी प्रेरणा म्हणजे बाहय प्रेरणा होय. यात बक्षिसके, प्रंशसा, निंदा, स्तुर्ती, प्रगतीचे जाणीव इ. हया टिकाऊ स्वरूपाच्या नसतात. यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अध्ययन अनुकुल वातावरण निर्माण करून त्यांच्या मधील अंतस्फुर्ती जागृत करून त्यांना ध्येयाकडे नेणे हे त्यांचे कर्तव्य आहे. पाठीवरती हात ठेवून नुसत लढ म्हण या दृष्टीकोनातून '' तू हे करू षकतो'' ''तु प्रयत्न कर '' '' तुला जमेल'' '' मी तुला मदत करेन'' '' खुप छान केलेस '' असी वाक्य विद्यार्थ्यांनमध्ये आत्मविष्वास निर्माण करू शकतात. त्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे महत्वाचे ठरते.

## शिक्षक व प्रेरणातंत्र

शिक्षकांने ध्येय व उद्यिष्ठांची निश्‍चिती केली पाहिजे कोणतेही कार्य का करायचे कशासाठी करायचे याची जर जाणिव नसेल तर त्यात आवड निर्माण होणारी नाही. शिकण्यासाठी प्रथम शिक्षकांनी ध्येय व उद्यिष्ठाची जाणिव करून दिली पाहिजे. म्हणजे विद्यार्थी ध्येयाच्या दिशेने प्रेरीत होईल.कोणताही घटक शिकविताना नविन अध्ययनासाठी पूर्वी घेतलेला अनुभव एक चांगला पाया ठरवू षकतो. नविन भागाविषयी काही माहिती आपलाली आहे असे लक्षात आल्यावर विद्यार्थ्यांना आपोआपच प्रेरणा मिळते. जुन्या व परंपरावादी अध्यापन पध्दती विद्यार्थ्यांना आवडत नाही. शैक्षणिक तंत्राज्ञानाचा उपयोग करून तसेच मानसशास्त्रीय सिध्दांता वापर करून, नव नविन अध्यापन पध्दती, दृकश्राव्य साधनाचा वापर, सहली, शैक्षणिक भेटी, अषा कृटी विद्यार्थ्यांनी प्रेरीत करतात. कधीकधी विद्यार्थी ऐकत नाही यासाठी एक तर शिक्षा किंवा पारीतोषीक याचा वापर करून त्याना प्रोत्साहन देणे दोन्हीचाही वापर संयुक्त पणे अध्यापनात करावा. कधीकधी विद्यार्थ्यांची स्तुती करावी किंवा दोष दाखवावे तर विद्यार्थ्यांना मध्ये निकोप र्स्पधा घडवून आनाव्यात. प्रत्येक विद्यार्थ्याला त्याची प्रगती समाधनकारक रित्या होत आहे. याची जाणीव त्याला कार्यासाठी प्रेरीत असते. तात्काळ जाणीव करून दिल्यामुळे प्रत्याभरण मिळते.

वर्ग व्यवस्थेमध्ये षिक्षक हा शिक्षण ही प्रेरणा शक्ती असते. त्यांनी बोलले चार शब्द विद्यार्थ्यांचे शब्द उजलवून टाकतात. याउलट चार कठोर शब्द उपहास याचा विद्यार्थ्यांनवर नकारात्मक परिणाम होतो. विद्यार्थ्यांचे वय, अभिरूची,कल, परिस्थिती लक्षात घेवून शिक्षकानी विद्यार्थ्याला शैक्षणिक वातावरण निर्माण करून दिले पाहिजे. यासाठी सर्व साधन सुविधान युक्त अशी वर्ग रचना अध्ययावत फर्निचर अध्यायनाची योग्य परिस्थिती, वर्गातील बैठक व्यवस्था इ. भौतिक सुविधांची व्यवस्था निर्माण करून द्यावी. सध्याच्या र्स्पधाकाळात विद्यार्थ्यांना उतरवतांना खुप कष्ट घ्यावे लागतात. विद्यार्थ्यांचा आंतरिक क्षमतेला

ओळखून त्यांला ती क्षमता कशी विकसित करता येईल हे त्यांना पोहचविल्या पाहिजेत. विद्यार्थ्यांचा व्यक्ति मत्व विकासासाठी प्रेरणा हा घटक अतीषय महत्वाचा ठरता. यासाठी शिक्षकाला विद्यार्थ्यांबद्यल प्रेम, विश्वास, अंतरीक जिव्हाला, आत्मीयता असवेत. र्दुदम्य आषावादी शिक्षक ध्येयवादी शिक्षक चांगले विद्यार्थी घडवू शकतात. विद्यार्थी ही आपल्या प्रगतीत शिक्षकांचा मोठा वाटा अभिमानाने समाजात सांगतात. म्हणून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सकारात्मक प्रेरणेकडे प्रवृत्त करावे. समाजातील चांगल्या वाईट गोष्टीची कल्पना दयावी. मानवातावाद संघ भावना,समूह भावना,एकत्वाची भावना, विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करावी. विद्यार्थ्यांसमोर एक नविन आदर्श शिक्षकांनी ठेवावा. अशा प्रकारे शिक्षकानी त्यांची आवड अभिरूची लक्षात घेवून त्यांना प्रेरीत करावे.

## संदर्भ सूची

**1.**पारसनीस, न. रा. ;2007 शिक्षकांचे प्रशिक्षण. पुणे : नित्य नूतन प्रकाशन.

**2.**गाजरे आर. व्हि. चिटणीस एस., पाटील एन. (2006) शिक्षणचे अधिष्ठान,पुणेः नित्य नुतन प्रकाशन.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com